तारापूर एज्युकेशन सोसायटीचे गोपाळ शिवराम वर्वे पूर्व प्राथमिक विद्यालय तारापूर

## तारापूर एज्युकेशन सोसायटी आभासी वार्षिक सर्वसाधारण सभा (आंतरजालाद्वारे)

रविवार दि. २६ सप्टेंबर २०२१

वार्षिक अहवाल सन २०१९-२०२०

तारापूर एज्युकेशन सोसायटी संचलित गोपाळ शिवराम वर्वे पूर्व प्राथमिक विद्यालय तारापूर सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षाचा अहवाल सादर करतांना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. या शैक्षणिक वर्षात पूर्व प्राथमिक विद्यालयाने ३६व्या वर्षात पदार्पण केले आहे.

पूर्व प्राथमिक विद्यालयाचे एकूण ६ वर्ग असून एकूण १९३ विद्यार्थी शिक्षण घेत होते. या विद्यालयात एकूण ६ शिक्षिका व २ शिपाई कार्यरत आहेत.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा पूर्व प्राथमिक स्तरावरूनच होत असतो. २०१९ - २०२० या शैक्षणिक वर्षाचा निकाल शेकडा १०० टक्के लागला होता.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास म्हणजेच मानसिक,बौध्दिक आणि नैतिक विकास होय. यासाठी शाळेत विद्यार्थ्यांमधील सुप्तगुणांच्या प्रकटीकरणासाठी व विकासासाठी अध्यापनातूनच या विद्यार्थ्यांचे विविध स्पर्धांचे व उपक्रमाचे आयोजन केले जाते. या स्पर्धेत व उपक्रमात समाविष्ट होण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते.

दि.१५.०६.२०१९ रोजी शिशुवर्ग, बालवर्ग, प्लेग्रुप शाळा सुरू.

दि.१४.८.२०१९रोजी"स्वातंत्र्यदिनानिमित्त"विद्यार्थ्यांना थोडक्यात माहिती देऊन विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली.

दि.२३.०८.२०१९ रोजी "कृष्णजयंती व दहिकला" हा सण बाळगोपाळांसह साजरा करण्यात आला.

दि.०३.१०.२०१९ रोजी शिशुवर्ग, बालवर्ग, प्लेग्रुप विद्यार्थ्यांची तोंडी परीक्षा घेण्यात आली.

दि.१६.१०.२०१९ ते दि.१८.१०.२०१९ या कालावधीत बालवर्गातील विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा घेण्यात आली.

दि.२५.११.२०१९ रोजी "काव्यगायन" स्पर्धा घेण्यात आली.

दि.०३.१२.२०१९ रोजी "कथाकथना" स्पर्धा घेण्यात आली.

दि.०४.१२.२०१९ रोजी चित्र हस्तकला प्रदर्शन भरविण्यात आले होते.

दि.१०.१२.२०१९ रोजी "चित्र रंगभरण" स्पर्धा घेण्यात आली.

दि.१२.१२.२०१९ रोजी "चित्रकला" स्पर्धा घेण्यात आली.

दि.१८.१२.२०१९ रोजी "क्रिडा" स्पर्धा घेण्यात आली.

दि.२७.१२.२०१९ रोजी पालक शिक्षक सभा दुसरी घेण्यात आली.

दि.०८.०१.२०२० रोजी शिशुवालवर्गाची शै.सहल चिंचणी येथे उमंग पार्क येथे नेण्यात आली.

दि.०४.०२.२०२० रोजी "अमृत महोत्सवी सांगता सोहळा" साजरा करण्यात आला.

दि.११.०२.२०२० रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ साजरा करण्यात आला.प्रमुख पाहुण्या होत्या सौ.निलिमा चुरी कुरगाव.

दि.१३.०२.२०२० रोजी "सांस्कृतिक कार्यक्रम" घेण्यात आला.

दि.१७.०३.२०२० पासून कोरोना संसर्ग प्रादुर्भावामुळे शाळा वंद होती. या काळात विद्यार्थ्यांना व्हॉटसॲपद्वारे अभ्यास देण्यात आला. विद्यार्थ्यांची सन २०१९- २०२० या शैक्षणिक वर्षाची वार्षिक परीक्षा ऑनलाईन माध्यमाद्वारे घेण्यात आली.

आदरणीय संस्थाचालक, शिक्षक व पालक यांच्या सहकार्यामुळे हे शिक्षणाचे पवित्र कार्य आम्ही यशस्वीरित्या पार पाडू शकलो. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आम्ही मन:पूर्वक अभिनंदन करित आहोत.

सौ.कविता कैलास दवणे.

गोपाळ शिवराम वर्वे पूर्व प्राथमिक विद्यालय